दिनांक 07/11/2022 (सोमवार) सायंकाळ

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. काटोल :– दिनांक २०/०९/२०१९ चे ०७.०४ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोशन गोपाल गहुकर, वय ३२ वर्ष, रा. पारडसिंगा, ह.मु. शेगाव मंदीर पारडसिंगा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. क्र. ६६५/१९ कलम ३०७ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १९/०९/२०१९ चे रात्री ११.०० वा. पुजारी गोपाळराव महादेव गहुकर, वय ६५ वर्ष, रा. पारडसिंगा हे हनुमान मंदीर येथे असतांना मंदीरात आलेल्या नमुद गुन्हयातील आरोपीने त्यास ३०रू. मागितले म्हणुन पुजारीने त्यास ‘‘कशाला पैसे मागतो मंदीरातून निघुन जा’’ असे म्हटले. म्हणुन आरोपीने पुजारीस धारदार शस्त्राने गळयावर, कानावर, छातीवर मारहाण करून जखमी केले. असे बयानात पुजारी यांच्या मुलाने दिल्याने वैदयकीय अहवालावरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. आकाश शाही, पोलीस स्टेशन काटोल यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक ०७/११/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. **पी. बी. घुगे** यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०७ भादंवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. पांडे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस शिवाई प्रमोद कोहळे, ब. नं. ४०५, पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १.५ कि. मी. अंतरावरील ओमसाई नगर, मौदा येथे फिर्यादी नामे—जयदेव राघोजी उरकुडे, वय ६३ वर्ष, रा. ओमसाई नगर, मौदा जि. नागपूर हे नमुद घटना वेळी घराला कुलुप लावुन वडोदा येथे नातेवाईकाकडे गेले असता दिनांक ०७/११/२०२२ चे ०७.०० वा. त्यांचे भाडेकरू नामे— रूषभ रोडगे यांनी फोनव्दारे माहिती दिली की, तुमच्या घराच्या रदवाजाचा कोंडा तुटलेला असुन कुलुप दिसत नाही. असे सांगितल्याने फिर्यादी याने घरी जावून पाहीले असता त्यांच्या घरातील नगदी १,७५०००/—रू. २) सोन्याचे ०२ प्रत्येकी १५ ग्रॅम अंदाजे कीमती ३०,०००/— ३) सोन्याची ०५ ग्रॅमची अंगठी किमती अंदाजे ५,०००/—रू. ४) सोन्याची ०३ ग्रॅमची अंगठी किमी ३,०००/— ५) सोन्याचे दोन जोड, कानातील टॉप्स किमती ४,०००/— असा एकुण २,१७,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**